| MHKO160009942022 | दाखल तारीख | - २३/१२/२०२२ |
|---|---|---|
| | नोंदणी तारीख | - ०२/०१/२०२३ |
| | निकाल तारीख | - १८/०६/२०२६ |
| | कालावधी | - ०३ वर्षे ०५ महिने १६ दिवस |

=========================================

## शाहूवाडी येथील दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचे न्यायालयात

**( पिठासिन अधिकारी - श्रीमती एस.डी. बागल यांचेसमोर )**

=========================================

**रेग्युलर कब्जा क्र. २/२०२३** **निशानी क्र.३४/अ**

१.नकुताई उर्फ सुनंदा शंकर दळवी, व.व.५५, धंदा-शेती,
रा.- बोंगेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापुर

२. बनुताई तुकाराम केसरे (मयत वारस)
२अ. श्री. आकाराम तुकाराम केसरे, व.व. ४९, धंदा- शेती,
रा.- कापशी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर
२ब. सविता सिताराम झेंडे, व.व. ४५, धंदा- शेती,
रा.- सावे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर

वादी

*विरूध्द*

प्रतिवादी

१. अनंत अवबा माने (मयत वारस)
१अ. संदीप अनंत माने, व.व. ४८, धंदा- नोकरी,
रा.- कापशी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर
१ब. विजय अनंत माने, व.व.४५, धंदा- शेती,
रा.- कापशी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर
१क. अमोल अनंत माने, व.व.४२, धंदा- नोकरी,
रा.- कापशी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर
१ड. सचिन अनंत माने, व.व.४३, धंदा- शेती,
रा.- आंबावडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापुर

२. शांताबाई बाळु पाटील, व.व.६५, धंदा- शेती,
रा.- कनदुर, ता. शिराळा, जि. सांगली

३. दत्तात्रय अवबा माने, व.व.६०, धंदा- शेती,
रा.- कापशी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर

४. शोभा बाळु पाटील, व.व.५२, धंदा- शेती,
रा.- सोनवडे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर

५. बाळुबाई सखाराम केसरे (मयत वारस)
५अ. लताताई बबन मोहिते-पाटील, व.व.४५, धंदा- शेती,
रा.- साळशी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर

======================================

उपस्थिती -

वादीतर्फे वकिल - श्री. व्ही.व्ही. बांबवडेकर

प्रतिवादी क्र.१अ,ब,क तर्फे वकिल - श्री. एस.बी. गुडाळकर(दावा मान्य पुरशिस)

प्रतिवादी क्र.१ ड तर्फे वकिल - एकतर्फा

प्रतिवादी क्र. २,३,४ तर्फे वकिल - दावा मान्य पुरशिस

प्रतिवादी क्र.५अ तर्फे वकिल - एकतर्फा

======================================

======================================

**न्यायनिर्णय**

**(घोषित दि. १८/०६/२०२६)**

======================================

१. प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटपासाठी व कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे.


२. **दावा मिळकतीचे वर्णन-**

अ) मौजे कापशी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर, येथील शेत मिळकत

| अ.नं. | गट नंबर | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रूपये पैसे | वादक्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे | पैकी हिस्सा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ७९५ | ०.१० | ०.१२ | ००१.६९ | ०.०२ | १/७ |
| २ | १७९ | ०३६.४० | ६.०६ | पुर्ण | ६.०६ | १/७ |
| ३ | ८०९ | ०७४.०० | ०.५६ | ०४७.३२ | ०.३६ | १/७ |

या मिळकतीस यापुढे दावा मिळकत असे संबोधण्यात येत आहे.

३. **<u>वादी व प्रतिवादी यांची वंशावळ खालीलप्रमाणे-</u>**




४. वादीने पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीचे मुळ पुरूष अवबा यांचे कायदेशिर वारस आहेत. दावा मिळकतीचे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्र. १अ ते ड तसेच प्रतिवादी क्र. ३ यांचे नावाची नोंद आहे. प्रतिवादी क्र. १अ ते ड तसेच प्रतिवादी क्र.३ हे वादी तसेच प्रतिवादी क्र.२,४अ, ५ यांचे कोणत्याही प्रकारची विचारपुस तसेच कोणत्याही प्रकारे माहेरपण करत नाहीत व ७/१२ पत्रकी नोंदी असलेचा गैरफायदा घेवुन दावा मिळकती या अन्य त्रयस्थ इसमास विक्री करत असल्याचे वादी यांना खात्रीशीर समजले म्हणुन वादी यांनी ता.१८/१२/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.३ यांना दावा मिळकतीमधील त्यांचा १/७ हिस्सा वाटप करून द्या असे सांगितले तेव्हा प्रतिवादी क्र.३ यांनी वाटप करून देणेस स्पष्ट नकार दिला. म्हणुन प्रतिवादीविरूध्द वाटपाचा तसेच दावा मिळकत विक्री करू नये म्हणुन कायम मनाईचा दावा दाखल करणे वादीस भाग पडले आहे.

५. प्रतिवादी क्र.१अ व १क यांनी नि.२२ वर त्यांना प्रस्तुतचा दावा मान्य असल्याची पुरशीस दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ब यांनी नि.२४ वर त्यांना प्रस्तुतचा दावा मान्य असल्याची पुरशीस दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ड,५अ यांना प्रस्तुतच्या दाव्याचे समन्स लागू होवूनदेखिल ते या दाव्याचे कामी हजर न राहिल्याने त्यांचेविरूध्द १८/०१/२०२३ रोजी एकतर्फा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ यांनी नि.१६ वर प्रस्तुतचा दावा मान्य असल्याबाबतची पुरशीस दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी नि.२६ वर प्रतिवादी क्र.४ यांनी नि.२७ वर प्रस्तुतचा दावा मान्य असल्याची पुरशीस दाखल केलेली आहे.

६. वादी यांचे वादपत्र आणि अभिलेखावरील कागदपत्रे यांचे अवलोकन केले, वादी यांचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. त्यावरून खालील मुद्दे माझे विचाराधीन आलेले आहेत. ते मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे दावा मिळकत हे वडिलोपार्जित मिळकत असल्याचे शाबीत करतात का? | होकारार्थी |
| २. | वादी हे दावा मिळकतीत अद्याप वाटप झाले नसल्याचे शाबीत करतात का ? | होकारार्थी |
| ३. | वादी हे दावा मिळकतीत वाटप मागणेस पात्र आहेत का? असल्यास वादीचा हिस्सा किती येतो? | होकारार्थी, वादी क्र.१ यास १/७ हिस्सा येतो व वादी क्र.२अ व ब यांना १/१४ हिस्सा येतो. |
| ४. | प्रतिवादी क्र. १अ ते ड व प्रतिवादी क्र.३ हे ७/१२ पत्रकी असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेवुन दावा मिळकत विक्री करत असल्याचे वादी शाबीत करतात का? | नकारार्थी |
| ५. | वादी हे कायम मनाई मिळणेस पात्र आहेत का? | नकारार्थी |
| ६. | आदेश आणि हुकूमनामा ? | दावा अंशत: मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिंमासा

७. वादी यांनी त्यांची बाजू सिध्द करण्यासाठी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.३२ वर दिलेले आहे. प्रतिवादी यांना पुरेशी संधी देऊन देखिल प्रतिवादी यांनी

उलटतपास न घेतल्याने त्यांचेविरुध्द दि. १७/०६/२०२६ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवूनदेखिल त्यांनी अभिलेखावर पुरावा दाखल न केल्यामुळे दि.१८/०६/२०२६ रोजीचे नि.१ वरील आदेशाद्वारे त्यांचेविरूध्द पुरावा नाही असा आदेश करण्यात आलेला आहे. वादी यांनी नि.३३ वरील पुरशिसद्वारे पुरावा संपला असे जाहीर केले आहे तसेच वादी यांनी नि. ३ सोबत नि.२९ ते ३१ वर मौजे कापशी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर येथील गट नं. ७९५,१७९,८०९ चा ७/१२ उतारा इ. कागदपत्र दाखल केली आहेत.

**<u>मुददा क्र. १ ते ३ करीता -</u>**

८. वादीने प्रस्तुतचा दावा त्यांचा हिस्सा वाटप करून मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१अ व १क यांनी नि.२२ वर त्यांना प्रस्तुतचा दावा मान्य असल्याची पुरशीस दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ब यांनी नि.२४ वर त्यांना प्रस्तुतचा दावा मान्य असल्याची पुरशीस दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ड,५अ यांना प्रस्तुतच्या दाव्याचे समन्स लागू होवूनदेखिल ते या दाव्याचे कामी हजर न राहिल्याने त्यांचेविरूध्द १८/०१/२०२३ रोजी एकतर्फा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ यांनी नि.१६ वर प्रस्तुतचा दावा मान्य असल्याबाबतची पुरशीस दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी नि.२६ वर प्रतिवादी क्र.४ यांनी नि.२७ वर प्रस्तुतचा दावा मान्य असल्याची पुरशीस दाखल केलेली आहे. वादीच्या कथनानुसार दावा मिळकती या वाडवडिलार्जित मिळकती आहेत व त्यामध्ये वादीचा १/७ हिस्सा येतो. वादीने नि.२९ ते नि.३१ वर दाखल केलेल्या ७/१२ उता–यांचे अवलोकन केले असता त्यावर प्रतिवादी नं. १अ ते १ड व प्रतिवादी नं. ३ यांचे नाव दिसुन येत आहे. प्रतिवादी नं. १अ,ब,क व प्रतिवादी नं.३ यांनी प्रस्तुतचा दावा मान्य केलेला आहे. यावरून तसेच वादी यांच्या पुराव्यावरून असे दिसुन येते की त्यांच्यात व प्रतिवादींमध्ये अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. वादी यांनी १८/१२/२०२२ रोजी प्रतिवादी नं.१अ ते १ड व प्रतिवादी नं.३ यांना दावा मिळकतीमधील वादींना येणारा हिस्सा वाटप करून मागितला असता नं.१अ ते १ड व प्रतिवादी नं.३ यांनी वाटप करून देणेस स्पष्ट नकार दिला.

९. प्रतिवादी नं.१अ ते १ड व प्रतिवादी क्र.२,३,४ यांनी प्रस्तुतचा दावा मान्य

केलेने व प्रतिवादी नं. १ड व प्रतिवादी नं. ५ यांनी प्रस्तुतच्या दाव्यास कोणतेही म्हणणे दाखल न केल्याने वादींची सर्व कथने खरी व ग्राह्य समजण्यात येतात. दावा मिळकती या वाडवडिलार्जित मिळकती असुन त्यात अद्याप सरस निरस मानाने वाटप झाले नसल्याचे वादी यांनी शाबित केलेले आहे. सबब, वादी हे दावा मिळकतीत त्यांचा हिस्सा वाटप करून मिळणेस पात्र आहेत. वाटपाच्या दावेमध्ये वादी व प्रतिवादी या दोघांचे हिस्से जाहीर करणे क्रमप्राप्त आहे. मयत अवबा यांच्या पत्नी तानुबाई या मयत असुन त्यांना अनंत, बबुताई, शांताबाई, बाळुबाई, दत्तात्रय, सुनंदा उर्फ नकुताई, सखुबाई असे वारस आहेत. वादी नं. १ यांना दावा मिळकतीत १/७ हिस्सा प्राप्त होतो. वादी नं. २ बबुताई या मयत असुन त्यांना येणारा १/७ हिस्सा हा त्यांचे वारस वादी नं.२अ व ब यांना प्रत्येकी १/१४ असा प्राप्त होतो. अवबा यांचे वारस अनंत हे मयत असुन त्यांना प्रतिवादी नं. १अ ते १ड नामे संदिप, विजय, अमोल, सचिन असे वारस आहेत. मयत अनंत यांना येणारा १/७ हिस्सा हा प्रतिवादी नं. १अ ते १ड यांना प्रत्येकी १/२८ असा प्राप्त होतो. प्रतिवादी नं. २ शांताबाई पाटील यांना दावा मिळकतीत १/७ हिस्सा प्राप्त होतो. प्रतिवादी नं. ३ दत्तात्रय माने यांना दावा मिळकतीत १/७ हिस्सा प्राप्त होतो. प्रतिवादी नं. ४ शोभा बाळु पाटील यांना दावा मिळकतीत १/७ हिस्सा प्राप्त होतो. प्रतिवादी नं. ५ बाळुबाई केसरे या मयत असुन त्यांना येणारा १/७ हिस्सा हा त्यांचे वारस लताताई मोहिते–पाटील यांना प्राप्त होतो. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुददा क्र. ४ व ५ करीता -</u>**

१०. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी नं. १अ ते १ड व प्रतिवादी नं.३ हे त्यांच्या नावे नोंद असलेल्या नोंदींचा गैरफायदा घेवुन दावा मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. परंतु वादीने सदर कामी प्रतिवादी नं.१अ ते ड व प्रतिवादी नं.३ हे दावा मिळकत विक्री करत असल्याबाबत कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. तसेच वादीला सहहिस्सेदारांविरूध्द मनाईसारखी दाद देखिल मागता येणार नाही. सबब मी मुद्दा क्र. ४ व ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे व मुद्दा क्र. ६ करिता खालील आदेश पारीत करत आहे.

# <u>आदेश</u>

**१.** दावा अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

**२.** दावा मिळकतीमध्ये वादी नं. १ यांना दावा मिळकतीत १/७ हिस्सा, वादी नं.२अ व ब यांना प्रत्येकी १/१४ हिस्सा, प्रतिवादी नं. १अ ते १ड यांना प्रत्येकी १/२८ हिस्सा, प्रतिवादी नं. २ यांना १/७ हिस्सा, प्रतिवादी नं. ३ यांना १/७ हिस्सा, प्रतिवादी नं. ४ यांना १/७ हिस्सा, प्रतिवादी नं. ५अ यांना १/७ हिस्सा मिळणेस पात्र ठरतात.

**३.** वादी आणि प्रतिवादी यांचा दावा कलम १ मध्ये नमूद मिळकतीमधील हिस्सा वाटून, विभागून मिळण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ नुसार हुकूमनामा मा. जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांचेकडे पाठविण्यात यावा.

**४.** येणेप्रमाणे प्राथमिक हुकूमनामा करण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Shraddha Dinkar Bagal

**स्थळ - शाहूवाडी**
**दिनांक – १८/०६/२०२६**

**(श्रीमती एस.डी. बागल )**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**मलकापुर-शाहूवाडी, जि. कोल्हापुर**